## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-3 मार्ग

### मेट्रो-3 च्या स्वयंचलित भाडे आकारणी प्रणाली कामाच्या पूर्व अर्हता निविदा खुल्या

**मुंबई, 21 मार्च, 2017-** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-3 या भुयारी मेट्रो मार्गाच्या स्वयंचलित भाडे आकारणी प्रणालीचे काम करण्यासाठी नामांकीत कंपन्यांकडून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (मुं.मे.रे,कॉ) भरघोस प्रतिसाद लाभला.

जायकाच्या नियमानुसार पूर्व अर्हता अर्ज नुकतेच मुं.मे.रे,कॉच्या कार्यालयात सादर करण्यात आले. पूर्व अर्हता अर्ज सादर करणा-या कंपन्यामध्ये मे. एजिज लिमिटेड व नांजिंग पांडा इंफोर्मेशन इंडस्ट्री कं.लि समुह, मे. इंद्रा सिस्टेमस एसए, मे. थलेस कॉम्युनिकेशनस एन्ड सेक्युरीटी एसएएस, मे. निप्पोन सिग्नल कं. लि, मे. एल एन्ड टी व एमएसआय ग्लोबल प्रा.लि, मे. सिंगापूर टेक्नॉलॉजी ईलेक्ट्रॉनिक्स लि, मे. झेरॉक्स बिझिनेस सोल्युशनस एसएएस, मे. एसआयसीई-वान इंफ्रा प्रा.लि, मे. डाटामॅटिक्स ग्लोबल सर्विसेस लि एन्ड एईपी टीकिटींग सोल्युशन्स एसआरएल, मे. सियासून रोबोट एन्ड आटोमॅशन कं. लि, मे. गोदरेज एन्ड बाईस मॅन्यु. कं प्रा.लि-एससी सॉफ्ट पीटीई लि, मे. एसिस ईलेक्ट्रॉनिक्स एन्ड कालिंदी रेल निर्माण यांचा समावेश होता. मुं.मे.रे,कॉ 60 दिवसांमध्ये पूर्व अर्हता निविदांचे मुल्यमापन करणार आहे.

याविषयी माहिती देतांना मुं.मे.रे,कॉच्या व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या की, "आम्हाला नामांकीत कंपन्याकडून पूर्व अर्हता निविदांना उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. स्वयंचलित भाडे आकारणी प्रणाली हा मेट्रो-3 मधील महत्त्वाचा घटक आहे. मेट्रो-3 मध्ये अद्ययावत व सक्षम स्वयंचलित भाडे आकारणी प्रणालीचा वापर आम्ही करणार असून त्यासाठी सर्वोत्कृष्ट कंपनीला सदर काम देण्यात येईल".